महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ७९ वी बैठक

| | |
|---|---|
| बैठक दिनांक | दिनांक:-२९- मे -२०२३ |
| ठिकाण | इस्लाम जिमखाना, मरीन लाईन मुंबई |
| वेळ | सकाळी ११.०० वाजता |

## बैठकीचे इतिवृत्त

**विषय क्रमांक. १: - सन्माननीय सदस्यांच्या रजेबाबत.**

**ठराव क्रमांक १: - सन्माननीय सदस्य श्री. फारुक शाह, विधानसभा सदस्य हे कोणतीही पुर्वसूचना न देता बैठकीस गैरहजर असल्याने त्यांची गैरहजेरी नोंदविण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २: - दिनांक ११.०४.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत**

**ठराव क्रमांक २: - दिनांक ११.०४.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

## (नोंदणी विभाग)

**विषय क्रमांक ३:- मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये दिनांक २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशा बाबत**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ मंडळ कार्यालयाकडे अंदाजीत १८५ याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका ६ महिन्यात म्हणजे दि. १५.०६.२०२३ पुर्वी निकाली काढण्या बाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ५(२) व कलम ४० तसेच महाराष्ट्र राज्य वक्फ नियम २०२२ मधील नियम १८ नुसार सर्व प्रकरणांची छाननी व तपसाणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष सुरु आहे. त्यामध्ये काही पक्षकारांकडुन कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदत वाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे या कार्यवाहीस अद्याप काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व १८५ याचिका महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळापुढे सुनावणीसाठी ठेवण्यात येणार आहेत. सदर सुनावणी पुर्ण होऊन आदेश पारीत होई पर्यंत किमान ६ महिन्याचा कालावधी आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरणे विहित कालमर्यादेत निकाली काढणे बाबत आदेशित केलेले असल्याने या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये **Inter locutary Application** दाखल करुन मुदत वाढ करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ३: -** **मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये दिनांक २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी आणखी कालावधी आवश्यक असल्याने ६ महिन्याची मुदत वाढ घेण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये Inter locutary Application दाखल करण्याबाबत ठराव पारित करण्यात आला.**

**विषय क्रमांक ४:-** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (५५) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/1184/2015 | Ayesha Masjid wo Madarsa | | Tandulwadi | Kannad | Aurangabad |
| 2 | ABD/1197/2015 | Masjid wo Madarsa Umer Farooque Rz. | Panpoi | Banshendra | Kannad | Aurangabad |
| 3 | ABD/634/2018 | Jama Masjid | | Garada | Kannad | Aurangabad |
| 4 | ABD/1027/2022 | Madina Masjid | | Takli Bk. | Kannad | Aurangabad |
| 5 | ABD/1028/2022 | Kabrastan-o-Dargah | | Lavhali | Kannad | Aurangabad |
| 6 | JLN/486/2017 | Madarsa Dawatul-Quran | At. Bilal Colony | Partur | Partur | Jalna |
| 7 | JLN/257/2019 | Noorani Masjid and Madarsa Zainatul Uloom | | Mudhegaon | Ghansawangi | Jalna |
| 8 | JLN/954/2022 | Masjid Bilal wa Madarsa | | Sipora Bazar | Bhokardhan | Jalna |
| 9 | PBN/225/2017 | Masjid Quba and Arbi Madarsa | At. Ashok Nagar | Parbhani | Parbhani | Parbhani |
| 10 | BED/872/2022 | Hazrat Abubakar Masjid | -- | Pathrud | Majalgaon | Beed |
| 11 | LTR/829/2017 | Masjid-E-Sufiya wo Dini Madarsa | Rahymat Nagar | Chincholi Raw | Latur | Latur |
| 12 | OSD/866/2015 | Makkah Masjid | | Kawatha | Umarga | Osmanabad |
| 13 | RTG/586/2022 | Jama Masjid wo Kabrastan Jamatul Muslimeen | | Kangavali | Lanja | Ratnagiri |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | RTG/1122/2022 | Jama Masjid Jamatul Muslimeen | | Gavane | Lanja | Ratnagiri |
| 15 | SLR/68/2021 | Lal Saheb Ali Dargah Masjid Madrasa Kabrastan Waqf | | Soregao | N. Solapur | Solapur |
| 16 | SLR/813/2022 | Sarvajanik Masjid | | Karmala | Karmala | Solapur |
| 17 | NSK/471/2018 & 393/2021 | Masjid | | Mahasarul | Nashik | Nashik |
| 18 | NSK/424/2019 | Madarasa Wa Masjid Jaitun Abdul Kadir Trust | | Sangameshwar | Malegaon | Nashik |
| 19 | NSK/279/2020 | Madarsa-wo-Masjid Darut Takva | At. S. No. 112, Plot No. 36, 37, 60 & 61 | Sangameshwar | Malegaon | Nashik |
| 20 | NSK/352/2022 | Madarsa wo Masjid Abuzer Gaffari | At. Survey No. 119/1/2, Plot No. 165,166,167, 168,169 | Malegaon | Malegaon | Nashik |
| 21 | NSK/438/2022 & 539/2022 | Madarsa-E-Ishamiya | At. S. No. 209/2, Plot No. 163, Guruwar Peth | Malegaon | Malegaon | Nashik |
| 22 | NSK/553/2022 | Masjid-O-Madarsa Ahle Sunnat Hajra Shah-e- Jilaan | At. Gut No. 244/1/B & 244/1/C, Plot No. 45 | Daregaon | Malegaon | Nashik |
| 23 | NSK/561/2022 | Muhammadiya Masjid-o-Madarsa | | Pimpalgaon-Baswant | Niphad | Nashik |
| 24 | ADR/305/2017 | Jama Masjid Waqf (Ahele Sunnat Val Jamat) | | Dhawalpuri | Parner | Ahmednagar |
| 25 | ADR/175/2023 | Jumma Masjid | | Chinchale | Rahuri | Ahmednagar |
| 26 | JGN/526/2017 | Jumma Masjid Trust | | Betawad Bk | Jamner | Jalgaon |
| 27 | JGN/393/2019 | Madina Masjid Lohare | At Lohare, Tq: Raver | Lohara | Raver | Jalgaon |
| 28 | JGN/416/2020 | Tadvi-Pinjari Samaj Masjid And Sadarshaha Dargah | At Amoda | Yawal | Yawal | Jalgaon |
| 29 | JGN/547/2021 | Noorani Masjid | | Shindi | Bhusawal | Jalgaon |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | JGN/376/2022 | Markaz Masjid | | Devalgaon (Gu) | Jamner | Jalgaon |
| 31 | JGN/1102/2022 | Muslim Kabrastan | G. No. 62 and 63 | Wakadi | Jamner | Jalgaon |
| 32 | DLE/176/2023 | Madrasa Rabia Basriya | At. Beside Jama Masjid, Firdose Nagar, Vadjai Road | Dhule | Dhule | Dhule |
| 33 | NDR/562/2021 | Makka Masjid Wo Madarsa Trust | at Shahada | Shahda | Shahda | Nandurbar |
| 34 | AMT/705/2018 | Muslim Qabrastan And Eidgah | | Khel Januji (Deshmukh Kurha) | Chandur Bazar | Amravati |
| 35 | AMT/39/2021 | Mehboob Subhani Madarsa Wa Ibadatgah Kameti | At. Kasidpura | Daryapur | Daryapur | Amravati |
| 36 | AMT/499/2022 | Neyazi Masjid | At. Naya Amner | Amner | Warud | Amravati |
| 37 | AMT/965/2022 | Ahle Sunat wa Jamat Hanafi Barelvi Maslake Aala Hazrat Makka Masjid | Shriram Nagar 2 | Chandur Bazar | Chandur Bazar | Amravati |
| 38 | AMT/970/2022 | Abubakar Siddiqi Sunni Masjid | Warha | Teosa | Teosa | Amravati |
| 39 | AKL/583/2015 | Arbi Madarsa-O-Masjid | | Talki Kh. | Akot | Akola |
| 40 | AKL/347/2021 | Mohammadiya Masjid | | Nimbha | Murtizapur | Akola |
| 41 | AKL/660/2022 | Muslim Qabrastan Committee (Idgah) | Chohatta | Chohatta | Akot | Akola |
| 42 | AKL/661/2022 | Muslim Idgah And Qabrastan Committee | Rel | Rel | Akot | Akola |
| 43 | AKL/687/2022 | Jama Masjid | -- | Keliweli | Akot | Akola |
| 44 | AKL/801/2022 | Masjid-E-Hazrat Ali Ahle Sunnat-wal-Jamat | | Adgaon Bk. | Telhara | Akola |
| 45 | AKL/914/2022 | Masjid Hazrat Bilal | | Alegaon | Patur | Akola |
| 46 | BLD/557/2022 | Noorani Masjid | -- | Sakhar Kherda | Sindhkhed Raja | Buldhana |
| 47 | BLD/1004/2022 | Masjide Hamidiya | | Kothali | Motala | Buldhana |
| 48 | BLD/1068/ | Jama Masjid | | Sonargav | Mehkar | Buldhan |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2022 | | | an | | a |
| 49 | WSM/206 /2023 | Maktab wa Masjide Sattar | At. Farah Colony | Washim | Washim | Washim |
| 50 | YTM/504/ 2022 | Noorani Masjid | At. Deurwadi (Bk.) | Deurwad i | Arni | Yavatmal |
| 51 | NGP/288/ 2019 | Sunni Jama Masjid Wo Kabrastan | At Post. Tanda | Tanda | Mauda | Nagpur |
| 52 | NGP/627/ 2021 | Masjid E Akhtar Raza and Madarsa | at Kalamna | Kalaman a | Nagpur | Nagpur |
| 53 | CDR/915/ 2016 | Noori Masjid Waqf Committee | At. Nanda (Fata) | Nanda (CT) | Korpana | Chandra pur |
| 54 | CDR/633/ 2022 | Madarsa Raza-E-Mustafa and Masjid | | Nanda (CT) | Korpana | Chandra pur |
| 55 | GDC/525/ 2017 | Khwaja Garib Nawaz Masjid | At Malewadi | Malewad a | Kurkheda | Gadchiro li |
| 56 | KPR/411/2 023 | Sunnat Muslim Jamat Madarsa Masjid wo Kabrastan | | Solankur | Radha Nagri | Kolhapur |
| 57 | PUN/225/ 2023 | Hazrat Yateem Shah Wali Dargah and Masjid | | Talegaon Dabhade | Mawal | Pune |
| 58 | PUN/226/ 2023 | Idgah Masjid wo Muslim Jamat Kabrastan | At. S. No. 367/2/B | Talegaon Dabhade | Mawal | Pune |
| 59 | PUN/228/ 2023 | Shahi Masjid wo Muslim Kabrastan | | Talegaon Dabhade | Mawal | Pune |
| 60 | JGN/295/2 023 | Sayyed Assrarul Kadriya Masjid | | Jalgaon | Jalgaon | Jalgaon |
| 61 | STR/847/2 022 | Madina Masjid | | Tardaf | Phaltan | Satara |

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लवाद प्रलंबित नाही. तसेच सदर प्रस्तांवाबाबत कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाही. करीता मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

**ठराव क्रमांक ४:-** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (६१) नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (६१) नोंदणीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे.

## (आस्थापना विभाग)

**विषय क्रमांक ५:-** ईदगाह, कब्रस्तान, खानखा, सर्व नं. ८, ७/२, ६ व ३१, कुतुबपुरा, जैसिंगपुरा, औरंगाबाद येथील सर्वे नं. ३१, सि.टी.एस.क्र. २३२, शिट नं. ३३, मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्यालय स्थलंतर करणेबाबत.

इदगाह, कब्रस्तान, खानखा, सर्व नं. ८, ७/२, ६ व ३१, कुतुबपुरा, जैसिंगपुरा, औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ व ३७ अन्वये क्रमांक MSBW/ABD/१३०२/२०२३ नोंदणीकृत वक्फ संस्था आहे.

सदर वक्फ संस्थेची मिळकत सर्वे नं. ३१, सि.टी.एस. क्र. २३२ शिट नं. ३३ क्षेत्र ४७२७.२० चौ.मि. जागा मध्ये अधिक्षक, अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण बांधकम विभाग, औरंगाबाद यांचा उल्लेख आहे. सदर कार्यालय दि.०८.०९.२०२२ रोजी जल भवन, देवगीरी कॉलेजच्या बाजु येथे स्थालंतर झालेला आहे.

महाराष्ट्र मध्ये सर्व जिल्ह्यामध्ये वक्फ कार्यालय उघडण्यासाठी शासन निर्णय क्र. वक्फ/२०२१/प्र.क्र.११४/का-४ दि.२४.०२.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्यालय पनचक्की परिसरातुन हलवुन अन्य ठिकाणी/वक्फ मंडळाच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर स्थालांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. उपरोक्त वक्फ संस्थेच्या मिळकतीमध्ये सि.टी.एस. क्र. २३२ क्षेत्र ४७२७.२० चौ.मि. मुख्यालय सुरू करण्याचा दृष्टींने शासनस्तरावर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यालय स्थालंतर करण्यासाठी अधिक्षक अभियंता, व जि. प्रा. औरंगाबाद यांच्या ताब्यामध्ये असलेली सि.टी.एस. क्र. २३२ क्षेत्र ४७२७.२० चौ. मि. इमारतीसह महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावीत करणे बाबत सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ५:-** **अधिक्षक अभियंता, व जि. प्रा. औरंगाबाद यांच्या ताब्यामध्ये असलेली सि.टी.एस. क्र. २३२ क्षेत्र ४७२७.२० चौ. मि. इमारतीसह महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे. इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.**

**विषय क्रमांक ६:-** **जिल्हा वक्फ कार्यालय, मुंबई येथील आवक रजिस्टर मधील संशयास्पद नोंदीबाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ संस्था नसल्याचा दावा करणा-या संस्थांनी आदेश पारीत केल्याच्या दिनांकाच्या आठ आठवड्याच्या आत (दि. १४.१२.२०२२) पर्यंत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ येथे अर्ज/याचिका दाखल करणे आवश्यक होते. सन २००३-२००४ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या वक्फ संस्थांन पैकी ज्या संस्थांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे विहित कालावधीत अर्ज दाखल केले नाहीत, अश्या संस्था मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वक्फ घोषीत झालेले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १८५ संस्थांचे अर्ज महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालयात दाखल करण्यात आलेल्या आहेत. मिनारा मस्जीद ट्रस्ट, मुंबई या संस्थे मार्फत दि. १४.१२.२०२२ पर्यंत कोणताही अर्ज या मुख्यालयाच्या कार्यालयामध्ये जमा करण्यात आलेला नाही. सबब, सदर संस्था आपोआप वक्फ घोषीत होते.

तथापि, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने माहे जानेवारी २०२३ मध्ये आयोजित केलेल्या सुनावणी मध्ये मिनारा मस्जीद ट्रस्ट, मुंबई तर्फे त्यांची बाजू मांडण्यात आली. या संदर्भात याचिका /अर्ज महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालयात सादर करण्यात आला आहे किंवा कसे याचा पुरावा देणे बाबत सदर पक्षकारांना आदेशित करण्यात आले असता, त्यांनी जिल्हा वक्फ कार्यालय मुंबई येथे दि. १२.१२.२०२२ रोजी टपाल दिले असल्याचे कागदपत्र सादर केले. या बाबत संशय निर्माण झाल्याने जिल्हा वक्फ कार्यालय मुंबई येथील आवक रजिस्टर मागविण्यात आले. सदर आवक रजिस्टर ची तपासणी केली असता, सदर आवक रजिस्टर

मध्ये छेडछाड करुन मिनारा मस्जीद ट्रस्ट, मुंबई यांचे टपाल नोंदविण्यात आल्याचे प्रथम दर्शनी स्पष्ट दिसून येते.

सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुरु असलेल्या अर्धन्यायीक कार्यवाहीमध्ये फसवणुकीने व संगणमताने व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सबब शासकिय नोंदी मध्ये फेरफार/छेडछाड केल्या बाबत तत्कालीन जिल्हा वक्फ अधिकारी, मुंबई व लिपीक, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय मुंबई तसेच मिनारा मस्जीद ट्रस्टचे अर्जदार यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम १२०ब, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७० व ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ६:-** **सदर संशयास्पद नोंदीबाबत संबंधितांकडून प्रथम खुलासा मागविण्यात यावा. खुलासा प्राप्त झाल्यानंतर गुन्हा दाखल करावा किंवा कसे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.**

## (चौकशी विभाग)

**विषय क्रमांक. ७: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | 69/799/2022 | Aurangabad | Yaseen Masjid, Nehru Nagar, Kat Kat Gate, Aurangabad | |
| 2. | 69/437/2022 | Jalna | Idgah at Bhokardan Tq. Bhokardhan Dist Jalna | |
| 3. | 69/878/2022 | Beed | Masjid Etequatpura, Peth Mohalla, Ashoorkhana and Graveyard, Parli Tq. Parli Dist Beed | |
| 4. | 69/642/2022 | Parbhani | Dargah Chand Bee Saheba at Gangakhed Tq. Gangakhed Dist Parbhani | |
| 5. | 69/122/2017 | Nashik | Masjid wo Madarsa Haji Abdur Rauf at Nayapura Malegaon Dist Nashik | |
| 6. | 69/52/2017 | Nashik | Sunni Shahi Masjid wo Kabrastan at Baragaon Pimpri Tq. Sinner Dist Nashik | |
| 7. | 69/85/2016 | Nandurbar | Harol Masjid Nandurbar Dist Nandurbar | |
| 8. | 69/108/2017 | Jalgaon | Madarsa Faizan E Raza Darul Quran village Bodhwad Tq. Bodhwad Dist Jalgaon | |
| 9. | 69/521/2021 | Jalgaon | Peer Balemiya Kabrastan wo Takiya Trust, Amalner Tq. Amalner Dist Jalgaon | |
| 10. | 69/410/2021 | Ahmednagar | Kanohba Urg Hazrat Baba Ramzan Shah at Pimpri walan Tq. Rahuri Dist Ahmednagar | |
| 11. | 69/545/2022 | Ahmednagar | Masjid at Loni Khurd , Loni Khurd Tq. Rahta Dist Ahmednagar | |

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| 12. | 69/102/2019 | Ahmednagar | Dargah Hazrat Nasharuddin Wali Baba (Rh.), Masjid & Kabrastan Adaon | |
| 13. | 69/420/2017 | Amravati | Jama Masjid wo Kabrastan Committee at Umri Itbarpur Tq. Daryapur Dist Amravati | |
| 14. | 69/349/2018 | Amravati | Imamwada, Paratwada Tq. Achalpur Dist Amravati | |
| 15. | 69(4)/978/2022 Amendment Scheme | Nagpur | Jamiat Islahul Muslimeen, 73, Awasthi Nagar Square, Nagpur | * |
| 16. | 69/673/2022 | Mumbai | Noor E Mohammadi Madarsa and Masjid at Gokhle Road Plot No. 240 Vile parle (E) Mumbai | |
| 17. | 69/673/2022 | Mumbai | Noor E Mohammadi Madarsa and Masjid at Gokhle Road, Plot No. 240, Vile parle, (e) Mumbai | |
| 18. | 69/994/2022 | Ratnagiri | Mariyam Masjid Jamatul Muslimeen, at Hussainpura Mohalla Burundi, Gut No. 81, S. No. 188/A, Plot No. 36 , Burundi Tq. Dapoli Dist Ratnagiri | |

उपरोक्त प्रकरणे तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

**ठराव क्रमांक ७:-** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त व्यवस्थापन योजनाच्या प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त अ. क्र. ९ वगळता उर्वरीत (१७) योजनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक. ८: - वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबावत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबावत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution | If Any case pending in the court Yes/No | Any court order Yes/No |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 42/143/2023 | Washim | The Peer Gaibi Masjid Sansthan Trust, at Ward No. 7, Washim | | |
| 2. | 42/537/2022 & 42/276/2021 | Pune | Qureshi Jumma Masjid Trust, at Baramati Tq. Baramati Dist Pune | | |
| 3. | 42/977/2022 | Nagpur | Jamiat Islahul Muslimeen, 73, Awasthi Nagar Square, Nagpur | | |
| 4. | 42/77/2023 | Kolhapur | Sunni Jumma Masjid, at Gadhinglaj, Dist Kolhapur | • टिप प्रमाणे:- | |
| 5. | 42/31/2023 | Ahmednagar | Tamboli Masjid, Charsamka Kabrastan and Masjid at Ahmednagar Dist Ahmednagar | | |

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution | If Any ease pending in the court Yes/No | Any court order Yes/No |
|---|---|---|---|---|---|
| 6. | 42/306/2023 | Amravati | Berar Muslim Educational conference and Osmania Masjid, Amravati | | |

उपरोक्त प्रकरणे कार्यालयाने तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

टिपः- दि ३० जानेवारी २०२३ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये श्री. मंजुर ताजुद्दीन मकानदार यांनी सुन्नी जुम्मा मस्जीद, गडहिंगलज जि. कोल्हापूर मध्ये फेरफार अर्ज दाखल केले होते त्यावर जिल्हा वक्फ अधिकारी कोल्हापूर यांनी त्यांचे पत्र २२७/२०२३ दि. ३ मे २०२३ रोजी अहवाल सादर करुन योजने मधील कलम २५ चे उप कलम ६ अन्वये आमसभा मध्ये निवडण्याची पध्दत आहे असे निदर्शनास आणून श्री. मन्सूर ताजुद्दीन व इतर १० यांचे फेरफार अर्ज मंजूर करणेसाठी शिफारस केले आहे. याबाबत दि. २६ मे २०२२३ रोजी श्री. जावेद इस्माईल मकानदार यांनी आक्षेप नोंदविले असून सदर आक्षेप फेटाळण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. ८: - अ. क्र. १ व अ. क्र. ३ वगळता अन्य प्रस्तावास वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार मान्यता देण्यात येत आहे. अ. क्र. १ येथील प्रस्ताव बाबत मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याने या बाबत सुनावणी आयोजित करुन निर्णय घेण्यात यावा. अ. क्र. ३ येथील प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.**

**अ. क्र. ४ येथील प्रस्तावा बाबत तक्रार अर्जाची छाननी करण्यात आली असता सदर तक्रारी मध्ये तथ्य आढळुन न आल्याने सदर तक्रार अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

## (लेखा विभाग)

**विषय क्रमांक ९:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे वार्षिक अंदाजपत्रक सादर करणेबाबत (Annual Budget)**

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ७८ येथील तरतुदीनुसार वक्फ मंडळाचे वार्षिक अंदाजपत्रक वक्फ मंडळाने शासनास सादर करणे अभिप्रेत आहे. वार्षिक अंदाजपत्रकाचा नमूना वक्फ नियम, २०२३ मध्ये नियम क्रमांक ४२ अन्वये विहित करण्यात आलेला आहे. त्यानुसार मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रक (Budget) वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ९:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १०:- वक्फ संस्थाकडून घेण्यात येणा-या वार्षिक योगदानाबाबत (Annual Contribution)**

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ७२ येथील तरतुदीनुसार वक्फ संस्थांकडून वार्षिक योगदान घेण्यात येते. मराठवाडा विभागातील वक्फ संस्थांकडून एकूण उत्पन्नाच्या वार्षिक ७ टक्के तर मराठवाडा वगळून इतर महसूली विभागातील (उर्वरित महाराष्ट्र) वक्फ संस्थांकडून एकुण वार्षिक उत्पन्नाच्या २ टक्के इतके वार्षिक योगदान (Annual Contribution) आकारले जाते. सदर आकारणी करतांना वक्फ संस्थांचे एकूण उत्पन्न विचारात घेण्यात येते. तथापि, वक्फ अधिनियमात एकूण उत्पन्ना एवजी निव्वळ उत्पन्नावर (Net Income) कमाल ७ टक्के वार्षिक योगदान (Annual Contribution) आकारणी करावयाची तरतूद आहे. सबब, संपुर्ण महाराष्ट्रातील वक्फ संस्थांसाठी निव्वळ उत्पन्नावर एकसमान Annual Contribution ची आकारणी करावयाचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक १०:- सदर बदलामुळे वक्फ मंडळाच्या तिजोरीवर किती प्रभाव पडणार आहे याबाबत प्रथम सनदी लेखापालाचे (Chartered Accountant) मत घेण्यात यावे.**

## (सियानत विभाग)

**विषय क्रमांक ११:- दर्गाह यतीम शाह मियॉ आशुरखाना व कब्रस्तान चौक, नांदेडच्या संबंधित वक्फ मिळकत पैकी १८x२९ फुट (५२२ चौ.फुट) जागा ०३ वर्षासाठी भाडेपट्टयावर देणे बाबत.**

दर्गाह यतीम शाह मियॉ आशुरखाना व कब्रस्तान चौक, नांदेड ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१०/१९७४ भाग-ब च्या अनुक्रमांक ३७ वर असुन सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणात आहे. सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित वक्फ मिळकत पैकी क्षेत्र १८x२९ फुट (५२२ चौ.फुट) जागा वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार भाडेतत्वावर देण्याकरीता सन २०२२ चे ऑनलाईन मुल्यांकन दर प्रमाणेदुकानसाठी प्रति चौरस मिटरचे दर रु.४३,५००/- इतके आहे. सदरील जागा व्यवसायीक वापरा करीता बाजार मुल्यांकनाचे २.५% प्रमाणे व बाजारात प्रचलित मासिक भाडे नुसार रु.४४४१/- आरक्षित करुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ आणि वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम, ५ नुसार इच्छुक लोकांकडून साध्या कागदावर बोलीसाठी अर्ज मागविण्यात आले व त्यासाठी जाहिर नोटीस दि.२७/१२/२०२२ रोजी वक्फ संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावून सदर लिलाव/बोली दि.२५/०१/२०२३ रोजी टेवण्यात आली होती.

सदर लिलाव/बोली मध्ये एकुण (०३) इच्छुक लोकांनी भाग घेवून बोली लावली त्यापैकी सर्वात जास्त बोली मोहम्मद अलीखान पिता गौसखान कादरी, रा.रहेमतनगर नांदेड यांनी प्रतिमाह भाडे रुपये ११,७८६/- लावली त्यामध्ये GST रक्कम समाविष्ट केली नाही सदर रकमेवर १८% GST रु.२१२१/- अशी एकूण रक्कम रु.१३,९०७/- प्रमाणे मासिक भाडे आकारुन त्यांच्या नावाने ११ महिन्याचे भाडेकरार करणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी पत्र क्र.जिवअ/नांदेड/सियानत विभाग-११/४६/२०२३ दि.०३/०२/२०२३ अन्वये अहवाल सादर केला होता परंतु लिलावास स्थगीती देणे बाबत मोहम्मद अय्युब मोहम्मद खाजा रा. उमर कॉलोनी, नांदेड यांनी दि.२०/१/२०२३ व दि.३/३/२०२३ रोजी अर्ज दिले तसेच सय्यद रियाजुलहसन सय्यद सिराजुल हसन जागीरदार रा. नांदेड यांनी सदर जागा दुस-याला हस्तांतर न करणे बाबत आक्षेप नोंदवला आहे. तसेच मोहम्मद रशिद अब्दुल रऊफ अशरफीवाला रा.साईनगर चॉंद मस्जीद मागे, बरकत कॉम्पलेक्स, नांदेड यांनी सदर लिलाव रद्द करुन पुन्हा जाहीर प्रगटन काढून लिलाव करण्याची विनंती केली होती. सदरचे आक्षेप विचारात घेवून पुढील ०३ वर्षे कालावधीसाठी दुकान व्यवसायकरीता

भाडेपट्ट्यावर लिलावाद्वारे देणेबाबत वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे लिलाव प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. याप्रकरणात मोहम्मद अलीखान पिता गोसखान कादरी मा.महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे सदर प्रकियेस स्थगीती मिळणेस वक्फ सुट दाखल केले आहे तथापि, प्रकरणात कोणतेही आदेश नसून सुनावणीत प्रलंबित आहे.

| वक्फ संस्थेचे नांव | भाडेपट्टयाने दयावयाच्या जमीनीचा तपशिल | बाजार मुल्यांकन | वृत्तपत्रात प्रसिध्दी | निविदेत भाग घेणा-यांची संख्या | लिलाव बोली भाडे प्रतीमाह | पात्र लिलाव धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| दर्गाह यतीम शाह मियॉ आशुरखाना व कब्रस्तान चौक, नांदेड | १८x२९ फुट (५२२ चौ.फुट) जागा | प्रति चौ.मि. रु.४३,५००/- प्रमाणे आरक्षित मासिक भाडे रु.४,४४१/- | १. दैनिक कामील यकीन<br>२. दैनिक नवभारत<br>दि.०४/०४/२०२३ | ०५ | **१) ३,११,७८६/-**<br>२) १७७८६/-<br>३) २४१०००/-<br>४) ११०००/-<br>५) १५०००/-<br>+१८% GST | शेख इमरान शेख शादुल्लाह रा.नांदेड |

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम १७ नुसार १ वर्षा पेक्षा जास्त व ०३ वर्षा पर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी वक्फ मंडळाची मंजुरी आवश्यक आहे प्रस्तुत प्रकरण पुढील मंजुरीसाठी वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ११:- दर्गाह यतीम शाह मियॉ आशुरखाना व कब्रस्तान चौक, नांदेडच्या संबंधित वक्फ मिळकत पैकी १८x२९ फुट (५२२ चौ.फुट) जागा ०३ वर्षासाठी भाडेपट्टयावर देणे बाबत याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १२:- वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ५१(१ए) येथील तरतुदीनुसार विकास कामे हाती घेण्यासाठी सल्ला देणे करिता स्वतंत्र एजंसीची नियुक्ती करणे बाबत.**

पीर करम अली शाह दर्गाह ट्रस्ट, पनवेल जि.रायगड येथील सि.टी.एस. नं. ५२१/१ प्लॉट नं. २३ येथील ५८९ चौ.मि. इतकी जागा धर्मदाय आयुक्त यांच्या परवानगीने सन. १९८१ मध्ये ९८ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्यावर देण्यात आलेली आहे. सदर जागे मध्ये नविन बांधकाम (निवासी इमारती) करावयाच्या असल्याने त्यासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची परवानगी मिळणे बाबत उमा कॉ. हाउसिंग सोसायटी यांच्या मार्फत वक्फ मंडळास दि. २२.०७.२०२२ रोजी विनंती करण्यात आली होती. सदर अर्जावर निर्णय न झाल्याने अर्जदारांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ४९४३/२०२३ दाखल केली. सदर याचिका मा. उच्च न्यायालयाने दि. २८.०४.२०२३ रोजी निकली काढली असुन अर्जदारांच्या मागणीवर १२ आठवड्यांच्या आंत निर्णय घेण्या बाबत वक्फ मंडळास आदेशित केले आहे.

सदर विकासाच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे विविध वक्फ संस्थांमध्ये विकास करण्या बाबतचे अर्ज प्रलंवित आहे. परभणी जिल्ह्यातील उस्मानिया मस्जीद, व तुराबुल हक्क दर्गाह या वक्फ संस्थेमध्ये विकास करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, राज्यातील वक्फ संस्थांच्या जागेवर वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ५१(१ए) च्या परंतुकातील तरतुदीनुसार विकास कामे हाती घेण्यासाठी मंडळास तांत्रीक सल्ला देणे करिता स्वतंत्र एजंसीची खुली निविदा प्रक्रिया राबवुन नियुक्ती करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १२:-** **वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ५१(१ए) येथील तरतुदीनुसार विकास कामे हाती घेण्यासाठी सल्ला देणे करिता स्वतंत्र एजंसीची नियुक्ती करणे बाबत सर्वानुमते ठराव पारीत करण्यात येत आहे. सदर एजंसीची नियुक्ती निविदा प्रक्रिया द्वारे करण्यात यावी.**

## (विधी विभाग)

**विषय क्रमांक १३:-**

श्री मेहबूब खान पठाण विधी अधिकारी महराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांची पुढील एक वर्षा साठी मुदत वाढ देणे व त्यांचे दिनांक १८-११-२०२२ रोजी दिलेल्या अर्जावर मानधान वाढ करणे बाबत विचार विनिमय करणे.

दिनांक १८-०५-२०२२ रोजी झालेल्या मुलाखाती नुसार श्री.मेहबूब खान पठाण यांची विधी अधिकारी म्हणून एक वर्षासाठी रुपये ५००००/- प्रती माह प्रमाणे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या नुसार त्यांनी दि.१-०६-२०२२ पासून पदभार स्वीकारला असून त्यांनी खालील प्रमाणे कामे केलेली आहे त्याचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे आहे.

१) अस्थापना विभाग सह विविध विभागाचे कामकाजा बाबत कायेदेशीर सल्ला देणे आहे.

२) वक्फ मंडळाचे विविध मस्जिदचे भूसंपादना अंतर्गत रस्त्याची आखणी स्थलांतर करणे तसेच विविध न्यायलयात / मा.उच्च न्यायलयात मस्जिदचा संव्रक्षणासाठी जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त /उच्च न्यायालयात बचावासाठी मसुदा तयार करणे.

३) महसूल विभागातील सर्व अभिलेखे प्राप्त करून घेणे तहसिलदार , उप जिल्हा अधिकारी, अपर जिल्हाधिकारी, अधीक्षक भूमी अभिलेख , उप संचालक भूमी अभिलेख यांचे कडील प्रकरणात दाव्याचे उत्तर तयार करणे, अपिलाचे मसुदा तयार करून दाखल करणे, स्वत: युक्तिवाद करणे इत्यादी कामे केली आहे. उदाहरणत आम खास मैदान प्रकरण , बीबी का मकबरा प्रकरण, गोल मस्जिद जालना, मूर्ती बेस जालना, यांचे अपील व युक्ती करणे व युक्तिवाद तयार करणे व प्रत्यक्ष युक्तिवाद करणे.

४) जिल्हा अधिकारी कार्यालय , विभागीय आयुक्त कार्यालय स्मार्ट सिटी कार्यालय यांचा बैठकीत वक्फ मंडळाचे प्रती निधित्व करणे.

५) विविध न्यायलयातील जसे वक्फ प्राधिकरण, उच्च न्याल्याय व सर्वोच्च न्यायालय इत्यादी दाव्यांचे मसुदा तपासणी करणे.

६) औरंगाबाद शहरातील विकास योजना मध्ये वक्फ मिळकती जसे मस्जिद, दर्गाह, इदगाह , खानखां इत्यादी विकास योजना नकाशावर वक्फचा वापर दर्शविणे, आरक्षणे रद्द करणे या धार्मिक स्थळा चे रस्त्याचा आखणीत बाधित होणारा भाग बदलण्या साठी प्रस्तावित करणे व विद्यमान जमीन वापर नकाशावर विद्यमान वक्फ मिळकती दर्शविणे इत्यादी कामे केली आहे.

श्री.मेहबूब खान पठाण विधी अधिकारी यांना महसूल अभिलेख, महानगरपालिका अभिलेख भूसंपादन प्रकीर्या तसेच तांत्रिक व प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. तसेच त्यांना नगर रचना

विभागाचा देखील दांडगा अनुभव आहे. त्यांचा सेवे मुळे वक्फ मंडळा फायदा झालेला आहे. तसेच या कामासाठी इतर कोणी अनुभवी अधिकारी उपलब्ध नाही.

दिनांक १८-११-२०२२ अन्वये , विधी सल्लागार ची सर्व कामे करीत असल्यामुळे त्यांनी विधी सल्लागार पदासाठी देय असलेले मानधान रुपये ८००००/- देणेस विनंती केलेली आहे.

तरी श्री.मेहबूब खान पठाण यांना पुढील एक वर्षा साठी दिनांक ०१-०६-२०२३ पासून मुदत वाढ देणे बाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १३:-** **श्री मेहबूब खान पठाण विधी अधिकारी महराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांची पुढील एक वर्षासाठी (दिनांक ०१.०६.२०२३ पासून) प्रति माहिना रुपये ६०,०००/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १४:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग केलेल्या प्रकरणात सुनावणी बाबत २ सिनियर ॲडव्होकेटची नियुक्तीस वाढ पुढील ३ माहिन्यासाठी नियुक्ती करणे बाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ मंडळ कार्यालयाकडे अंदाजीत १९० याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका विहीत कालमर्यादेत निकाली काढण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. सदर कामासाठी मंडळास कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. ईकबाल हुसैन व ॲड. वहाब काझी यांची वक्फ मंडळाच्या बैठकी दि. २० जानेवारी २०२३ ठराव क्र. २४ अन्वये दि. ३१ जानेवारी २०२३ ते ३० एप्रिल -२०२३ पर्यंत (३) महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर कामासाठी ॲड. ईकबाल हुसैन रुपये ६००००/- प्रतिमाह व ॲड. वहाब काझी रुपये ४००००/- प्रतिमाह अदा करण्यात येत असुन सदरहू नियुक्ती पुढील (३) माहिन्याच्या कालावधीसाठी वक्फ मंडळाच्या निर्णयासाठी सादर

**ठराव क्रमांक १४:-** **ॲड. ईकबाल हुसैन व ॲड. वहाब काझी यांच्या नियुक्तीस दोन माहिन्यांच्या कालावधीसाठी (जुन अखेरपर्यंत) मुतदवाढ देण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

## (अतियात विभाग)

**विषय क्रमांक १५ :-** **वक्फ़ संस्था आशुरखाना नालेहैदर महेताब अलीशाह व कब्रस्थान नक्कारखाना बरादरी टिळक रोड परभणी च्या मुतवल्ली बाबत.**

वक्फ़ संस्था आशुरखाना नालेहैदर महेताब अलीशाह व कब्रस्थान नक्कारखाना बरादरी टिळक रोड परभणी ही वक्फ़ संस्था नोंदणीकृत असुन ज्याचा नोंदणी क्र.मरावम/पीबीएन/४७/२०१०, दि. १६/०७/२०१०, असा आहे. तसेच शासन राजपत्र भाग-क अनुक्रमांक १३, दि. ०२/०५/१९७४ वर नोंद आहे.

जिल्हा वक्फ़ अधिकारी परभणी यांचे पत्र क्र.वक्फ़/पीबीएन/मरावम/१४६/२०२०, दि. १९/१०/२०२०, अन्वये श्री.मुश्ताक अहेमद पिता मोहम्मद अली शाह रा.पाणी टाकी जवळ युसुफ़ कॅलनी परभणी यांना कोणतेही आक्षेप व तक्रार प्राप्त झाली नाही असा अहवाल दिला आहे. तसेच जिल्हा वक्फ़ अधिकारी यांचे

पत्र क्र.वक्फ़/परभणी/५३०/२०२२, दि. ३०/११/२०२२, अन्वये वक्फ़ संस्थेचा मुतवल्ली नसल्याने जिल्हा वक्फ़ अधिकारी कार्यालयामध्ये सर्वे नं. १,२,३ मध्ये एकुण ११ भाडेकरुची नोंद आहे त्यांचे भाडे जिल्हा वक्फ़ अधिकारी परभणी तर्फे वसुल करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडाळाच्या बैठक दि. ११/१२/२०२२, मध्ये तात्पुरते मुतवल्ली नेमणुकीबाबत प्रस्तावांची पुनश्च तपासणी करुन प्रस्ताव मंडळासमोर सादर करावा. मुतवल्ली नेमणुकीसाठी आवश्यक अटी व शर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करुन त्या बाबतचे आदेश निर्गमीत करावे असा ठराव महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाचे बैठकीत ठराव क्र.१७ मध्ये घेण्यात आला.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट पिटीशन क्र.WP/४२१५/२२, चे आदेश दि. २०/०६/२०२२, मध्ये १५/१०/२०२२, पर्यंत महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ यांनी निर्णय घेण्यात यावा असा आदेश दिला आहे. राजपत्रातील मुतवल्ली व श्री. महमुद अली शाह रोशन अली शाह यांचा वंशपरंपरागत वारसा/संबंध असल्याचा कोणत्याही पुरावा नसल्याने अर्जदार श्री. मुश्ताक अहमद पिता मोहम्मद अली शाह यांचा मुतवल्ली बाबतचा अर्ज फेटाळणे बाबत शिफारस करण्यात येत आहे. .

ठराव क्रमांक १५:- **मुतवल्ली नियुक्तीबाबत अर्जदाराने कोणतेही ठोस कागदपत्रे सादर केलेले नाहीत. मुतवल्ली नियुक्तीबाबत अर्जदारांचा कोणताही हक्क नाही. सबब, अर्जदार श्री. मुश्ताक अहमद पिता मोहम्मद अली शाह यांचा मुतवल्ली नियुक्तीबाबतचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्या समोर
## वक्फ अधिनियम १९९५ च्या अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतरचे आदेश

विषय क्रमांक १६ :- दर्गाह हजरत राज मोहम्मद साहब मस्जिद व कब्रस्तान, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीडच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/BED/१४६/२००७

ठराव क्रमांक १६:- **सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

विषय क्रमांक १७:- दर्गाह हाजी मस्तानशाह बाबा, अनसिंग, ता.जि. वाशिमच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/WSM/४४/२०१०

ठराव क्रमांक १७:-

१. श्री. शेख उस्मान हुसैन व इतर (नस्ती क्र. ६९/१९०/२०१६) यांनी सादर केलेली योजना अमान्य करण्यात येत आहे.

२. श्री. मोहम्मद इफ्तेखार अब्दुल रहेमान व इतर (नस्ती क्र. ६९/५९२/२०१६) यांनी सादर केलेली योजना मान्य करण्यात येत आहे.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करावे.

विषय क्रमांक १८ :- रुई मस्जिद ट्रस्ट, ता. राहता, जि. अहमदनगरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/११९/२००८

ठराव क्रमांक १८:-

१) श्री. अकील सुल्तान इनामदार व इतर (नस्ती क्र. ४२/१४१/२००८) यांनी दाखल केलेला फेरबदल अर्ज अर्धवट असल्याने तसेच नविन विश्वस्त निवडीबाबत कोणतेही पुरावे सादर केले नसल्याने सदर फेरबदल अर्ज फेटाळण्यात येत आहे.
२) श्री. सय्यद हुसैन नुराभाई व इतर (नस्ती क्र. ४२/३०६/२०१२) यांनी दाखल केलेला फेरबदल अर्ज मंजुर करण्यात येत असून पुर्वीचे विस्वस्त श्री. गुलाब भाई सय्यद (मयत) यांच्या ऐवजी वंशपरंपरेनुसार श्री. सय्यद हुसैन नुराभाई यांचे नांव समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करावे.

विषय क्रमांक १९ :- सुन्नी मुस्लिम मस्जिद ट्रस्ट, नाशिक रोड, नाशिकच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/NSK/२८९/२०१०

ठराव क्रमांक १९:-

१. सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त ४ फेरबदल अर्ज (नस्ती क्रमांक ४२/४३७/२०१८, ४२/४७४/२०२१, ४२/३१७/२०२२, ४२/२९०/२०२१) हे कार्यरत विश्वसतांच्या एकमताने दाखल करण्यात आलेले नसल्याने सदर फेरबदल अर्ज फेटाळण्यात येत आहेत.
२. सदर फेरबदल अर्जाबाबत प्राप्त तक्रारी देखील निकाली काढण्यात येत आहेत.
३. मंजुर योजनेतील कलम ९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार रिक्त ३ पदावर १) अनवर मोहम्मद पठाण, २) सिकंदर खान रमजान खान, ३) मुजीर जिलानी खान यांची नियुक्ती करण्यात येत आहे.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करावे.

विषय क्रमांक २० :-मस्जीद हजरत फातेमा जोहरा, इनामदारवाडा, बारागांव नांदुर ता. राहुरी, अहमदनगर दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या योजना मंजुरी देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/NSK/२८९/२०१०

ठराव क्रमांक २०:-

१) प्रस्तुत वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी श्री. सय्यद युसुफ व इतर यांनी दाखल केलेली योजना (संचिका कलम ६९/४०६/२०१५) मंजूर करण्यात येत आहे.
२) श्री. जब्बार शेख व एजाज काकर यांनी दाखल केलेले योजना मंजुरी अर्ज फेटाळण्यात येत आहे.
३) श्री. युसुफ सय्यद व इतर यांनी दाखल केलेले योजनेस प्राप्त सर्व हरकती फेटाळण्यात येत आहे.
४) या बाबतची सविस्तर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गमित करावे.

विषय क्रमांक २१ :-हड्डीमार मस्जिद ट्रस्ट, अकोलाच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/AKL/१०७/२००९

ठराव क्रमांक २१:-

१) श्री. शफिक अहेमद खान सनाउल्लाह खान (नस्ती क्र. ४२/२२१/२०१३) यांनी सादर केलेला फेरबदल अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
२) सदर फेरबदल अर्जाबाबत प्राप्त श्री.अब्दुल रशिद मोहम्मद सिद्दीक व इतर हरकतदार यांचे आक्षेप फेटाळण्यात येत आहेत.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करावे.

विषय क्रमांक २२ :-मदिना मस्जिद पुणे/ जमराहत इतेहात मुस्लिमीन या वक्फ संस्थेच्या मंजुर झालेल योजनेनंतर प्राप्त झालेल्या हरकतीवर योग्यतो निर्णय देणे. नोंदणी क्र. MSBW/PUN/४६०/२०१६

ठराव क्रमांक २२:- सदर प्रकरणाची अंतिम सुनावणी आयोजित करण्यात यावी.

ठराव क्रमांक २३:- बहुतांश वक्फ मालमत्ता शासनाचे विविध विभागांच्या ताब्यात असल्याचे निदर्शनास आले आहे सबब शासनाचे विविध विभागाकडे असलेल्या वक्फ मालमत्तांची माहिती जमा

करण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी नियुक्त करुन त्यांच्याकडे ते काम सोपविण्यात यावे.

ठराव क्रमांक २४:- आलमगीर मस्जीद, कोंडवा ता. जि. पुणे च्या सुरु असलेल्या बांधकामा बाबत वक्फ मंडळाने तिव्र नाराजगी व्यक्त केली आहे. याबाब आयुक्त महानगर पालिका पुणे व पोलीस आयुक्त पुणे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र लिहावे.

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | 29/5/23 |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ५ | मा. फारुख अन्वर शाह,<br>मा. विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य, म.रा.व.मं. औरंगाबाद | अनुपस्थित |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| | | |
| | श्री. मो. बा. ताशिलदार<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |